॥ श्री ॥

१५ ब्रह्मानन्दे विषयानन्दः

- या पंधराव्या प्रकरणाचा प्रतिपाद्य विषय सांगतात-

अथात्र विषयानन्दो ब्रह्मानन्दांशरूपभाक् ।
निरूप्यते द्वारभूतस्तदंशत्वं श्रुतिर्जगौ ॥१

अन्वयार्थ - [अथ अत्र ब्रह्मानंदाशरूपभाक् द्वारभूतः विषयानन्दः निरूप्यते-] आतां या प्रकरणांत ब्रह्मानंदांशरूप व द्वारभूत- ब्रह्मज्ञानाचें साधन असा विषयानन्द निरूपण केला जात आहे. [तदंशत्वं श्रुतिः जगौ-] याला ब्रह्मानन्दाचें अंशत्व आहे असें श्रुतीनें सांगितलें आहे.

प्रकाशः- आतां येथें विषयानंदाचें प्रतिपादन करावयाचें आहे. पण त्याचा काय उपयोग होणार ? असें कदाचित् कोणी म्हणेल म्हणून ग्रंथकार सांगतात कीं, हा विषयानंद ब्रह्मानंदाच्या प्राप्तीचें साधन आहे. कारण हा त्या ब्रह्मानंदाचा अंश आहे. आणि अंशाचें ज्ञान झाल्यावांचून अंशीचें * ज्ञान होणें शक्य नाहीं. आतां यास प्रमाण काय म्हणून विचाराल तर सांगतों: -स्वतः श्रुति माउलीनेंच 'विषयानंद ब्रह्मानंदाचा अंश आहे' असें सांगितलें आहे. ॥१॥

-विषयानंद ब्रह्मानंदाचा एकदेश आहे असें सांगणारी श्रुति अर्थतः पढतात -

एषोऽस्य परमानन्दो योऽखंडैकरसात्मकः ।
अन्यानि भूतान्येतस्य मात्रामेवोपभुंजते ॥२

अन्वयार्थ -[यः अखंडैकरसात्मकः एषः अस्य परमानंदः] जो अखंड व एकरसात्मक तोच ह्याचा परमानंद होय. [अन्यानि भूतानि एतस्य मात्रां एव उपभुंजते -] दुसरीं भूतें याच्या अंशाचाच उपभोग घेतात.

प्रकाशः- अखंडः - खंडरहितः एकसारखा प्रवाह रूपानें राहणारा. एकरस०- म्हणजे आनंदावांचून दुसऱ्या कशाचाहि ज्याच्यामध्यें लेशहि नसतो; 'असा आनंदच या परमात्म्याचा परमानंद आहे. या आनंदाच्या योगानेंच इतर भूतें आनंदित होतात. ब्रह्मापासून मुंगीपर्यंत प्राण्यांना जो आनंद होत असतो, तो या परमात्म्याचाच अंश होय.' असें बृहदारण्यकादि उपनिषदांमध्यें स्पष्टपणें सांगितलेलें आहे. ॥२॥

-आतां विषयानंद ब्रह्मानंदाचा लेश आहे हें प्रमाणपूर्वक दाखविण्याकरितां प्रथमतः विषयानंदाच्या उपाधिभूत अंतःकरणवृत्ति किती आहेत तें सांगतात -

शांता घोरास्तथा मूढा मनसो वृत्तयस्त्रिधा ।
वैराग्यं क्षांतिरौदार्यमित्याद्या शांतवृत्तयः ॥३
तृष्णा स्नेहो रागलोभावित्याद्या घोरवृत्तयः ।
संमोहो भयमित्याद्याः कथिता मूढवृत्तयः ॥४

अन्वयार्थ - [शांताः घोराः तथा मूढाः इति मनसः त्रिधा वृत्तयः सन्ति-] शांत, घोर व मूढ अशा मनाच्या त्रिविध वृत्ति आहेत. [वैराग्यं क्षांतिः औदार्यं इत्याद्याः शान्तवृत्तयः-] वैराग्य, क्षमा, उदारपणा इत्यादि शांतवृत्ति होत. [तृष्णा स्नेहः रागलोभौ इत्याद्याः घोरवृत्तयः-] तृष्णा, स्नेह, राग, लोभ इत्यादि घोर-वृत्ति [च संमोहः भयं इत्याद्याः मूढवृत्तयः कथिताः-] व मोह, भय इत्यादि मूढवृत्ति सांगितलेल्या आहेत.

प्रकाशः- सत्त्व, रज व तम या तीन गुणांमुळें शांत,

* अंशी म्हणजे ज्याला अंश आहेत तो. यासच अवयवी असेंहि म्हणतात. जसें: - हात, पाय, इत्यादि अवयव; व ते ज्यास आहेत तो देह अवयवी.

घोर व मूढ अशा क्रमानें तीन प्रकारच्या वृत्ति झालेल्या आहेत पण अमुक वृत्ति शांत आहे; अमुक घोर आहे; इत्यादि कसें ओळखतां येईल ? असें कोणी विचारील, म्हणून त्यांना ओळखण्याची सामान्य दिशा दाखवितात. वैराग्य, क्षमा, उदारपणा, निरभिमान, इत्यादि प्राणिसमुदायास व स्वत:स सुखी करणाऱ्या वृत्ति शांत किंवा सात्त्विक होत. तृष्णा, स्नेह, राग, लोभ, दंभ इत्यादि स्वत:स व दुसऱ्यांसहि दु:खांत लोटणाऱ्या वृत्ति घोर किंवा राजस होत; आणि अविवेक, भय, आळस इत्यादि सर्वत्र हानि करणाऱ्या वृत्ति मूढ किंवा तामसी होत. हा सर्व प्रकार श्रुति, स्मृति इत्यादि ग्रंथांतून विस्तारपूर्वक सांगितलेला आहे. ॥३॥४

-पण या सर्व वृत्तीमध्यें ब्रह्माच्या चैतन्याचें व शांत वृत्तीमध्यें त्याच्या सुखाचें भान होतें, असें सांगतात --

वृत्तिष्वेतासु सर्वासु ब्रह्मणश्चित्स्वभावता ।
प्रतिबिंबति शांतासु सुखं च प्रतिबिंबति ॥५

अन्वयार्थ - [एतासु सर्वासु वृत्तिषु ब्रह्मण: चित्स्वभावता प्रतिबिंबति-] या सर्व वृत्तींमध्यें ब्रह्माची चिद्रूपता प्रतिबिंबित होते. [च शांतासु सुखं प्रतिबिंबति-] व शांत वृत्तीमध्यें सुख प्रतिबिंबित होतें.

प्रकाश:- ब्रह्माच्या चैतन्याचें भान जसें या सर्व वृत्तींमध्यें होतें, तसें सुखाचें होत नाहीं. तर केवल शांत वृत्तींमध्येंच सुखाचें भान होतें. तात्पर्य शांतवृत्तींमध्यें ब्रह्माचें चैतन्य व सुख या दोघांचाहि प्रत्यय येतो आणि घोर व मूढ या वृत्तींमध्यें केवल चैतन्याचाच भास होतो. ॥५॥

- या उक्त अर्थीं श्रुतिवाक्य अर्थत: पढतात -

रूपं रूपं बभूवासौ प्रतिरूप इति श्रुति: ।
उपमा सूर्यकेत्यादि सूत्रयामास सूत्रकृत् ॥६

अन्वयार्थ- [असौ रूपं रूपं प्रतिरूप: बभूव इति श्रुति: अस्ति-] हा परमात्मा प्रत्येक देहांत त्या त्या देहाप्रमाणें झाला, अशी श्रुति आहे. त्या अर्थींच व्याससूत्राचा एकदेश पढतात - [तथा उपमा सूर्यकेत्यादि सूत्रकृत् सूत्रयामास-] त्याचप्रमाणें 'एवढ्याकरितांच सूर्याच्या प्रतिबिंबाची उपमा दिली आहे' असें ब्रह्मसूत्रकारांनीं सूत्र केलें आहे. - ब्र. सू. अ. ३. २. १८. पहा.

प्रकाश:- 'सर्व व्यापी आत्मा आपल्या उपाधीप्रमाणें दिसूं लागला' असा श्रुतींचा अर्थ असून ''परमात्मा नित्य चिद्घन असल्यामुळेंच त्याच्या ह्या जीवरूप परिणामास सूर्याच्या प्रतिबिंबाची उपमा दिली आहे'' असा 'अत एव०' इत्यादि सूत्राचा अर्थ आहे. प्रस्तुत सूत्र शारीरकाच्या तिसऱ्या अध्यायाच्या पादांतील अठरावें आहे. ॥६॥

-परमात्मा स्वरूपत: एकच असतांना उपाधीशीं संबंध झाल्यामुळें त्याच्यामध्यें अनेकपणा आला आहे, असें आतां श्रुतीचा निर्देश करून सांगतात -

एक एव हि भूतात्मा भूते भूते व्यवस्थित: ।
एकधा बहुधा चैव दृश्यते जलचंद्रवत् ॥७

अन्वयार्थ - [एक: एव हि भूतात्मा भूते भूते व्यवस्थित: अस्ति-] एकच भूतात्मा प्रत्येक भूतामध्यें भिन्न भिन्न होऊन राहिला आहे, [जलचंद्रवत् एव एकधा च बहुधा दृश्यते-] तो जलांत दिसणाऱ्या चंद्राप्रमाणेंच एक प्रकारचा व अनेक प्रकारचा दिसतो.

प्रकाश:- चंद्र जरी आकाशांत एकच असला तरी जितक्या भांड्यांत पाणी ठेवून पाहावें, तितक्यांतहि तो दिसतोच. पण त्यावरून चंद्र अनेक झाले आहेत असें समजूं नये. त्याप्रमाणें हा एकच परमात्मा अनेक शरीररूप उपाधींमुळें अनेक आहे असें वाटतें; पण तें खरें नव्हे. कारण ज्ञानी पुरुषांच्या दृष्टीनें त्याचें एकत्व सर्वदा कायम असतें. ॥७॥

-पण 'निरवयव ब्रह्माचें कोठें चिद्रूपानेंच भान होणें

व कोठें चिदानंदरूपानेंच भान होणें अशक्य आहे' असें कोणी म्हणेल म्हणून चंद्राच्या दृष्टान्तानेंच त्याचा परिहार करितात -

जले प्रविष्टश्चंद्रोऽयमस्पष्टः कलुषे जले ।
विस्पष्टो निर्मले तद्वद्द्वेधा ब्रह्मापि वृत्तिषु ।।८

अन्वयार्थ - [यथा जले प्रविष्टः अयं चंद्रः-] ज्याप्रमाणें जलामध्यें प्रविष्ट झालेला हा चंद्र [कलुषे जले अस्पष्टःच निर्मले विस्पष्टः-] गढुळ पाण्यांत अस्पष्ट व निर्मल पाण्यांत अति स्पष्ट दिसतो, [तद्वत् ब्रह्म अपि वृत्तिषु द्वेधा भवति-] त्याप्रमाणें ब्रह्महि वृत्तींमध्यें दोन प्रकारचें होतें.

प्रकाशः- सर्वच पाण्यामध्यें चंद्राचें प्रतिबिंब पडतें हें खरें. पण पाणी स्वच्छ असल्यास त्यांत तें स्पष्ट दिसतें; पाणी गढूळ असल्यास त्यांत अस्पष्ट दिसतें; तें संथ असल्यास प्रतिबिंबहि स्थिर दिसतें; व चंचल असल्यास प्रतिबिंबहि चंचल दिसतें. त्याचप्रमाणें जशा जशा वृत्ति असतात, त्या त्याप्रमाणें त्यांत ब्रह्माचें प्रतिबिंब दिसतें. ।।८।।

- आतां पूर्वोक्त प्रकाराचेंच उपपादन करितात -

घोरमुढासु मालिन्यात्सुखांशश्च तिरोहितः ।
इर्षन्नैर्मल्यतस्तत्र चिदंशप्रतिबिंबनम् ।।९

अन्वयार्थ - [घोरमूढासु मालिन्यात् सुखांशः च तिरोहितः-] घोर व मूढ वृत्तींमध्यें, त्यांच्या मलिनतेमुळें, सुखाचा अंश गुप्त झालेला असतो. [इर्षन्नैर्मल्यतः तत्र चिदंशप्रतिबिंबनं भवति-] थोड्या निर्मलतेमुळें त्यांत चैतन्याचा अंश प्रतिबिंबित होतो.

प्रकाशः- पूर्वोक्त दृष्टान्ताप्रमाणें घोर व मूढ वृत्ति मलिन असल्यामुळें त्यांत सुखाचा अंश भासत नाहीं. पण त्या वृत्ति थोड्याशा निर्मल असल्यामुळें त्यांत चैतन्याचा मात्र भास होतो. म्हणजे त्या मलिन वृत्तींत ब्रह्माचें अस्पष्ट प्रतिबिंब पडतें. ।।९।।

-'अहोपण, चंद्राची उपाधि जें उदक तें दोन प्रकारचें असल्यामुळें त्यांत चंद्राचें स्पष्ट व अस्पष्ट भान होणें युक्त आहे. पण अंतःकरण ही उपाधि एकरूप असल्यामुळें आत्म्याच्या एकांशाचें भान संभवत नाहीं' अशी शंका घेऊन दुसरा दृष्टान्त सांगतात --

यद्वाऽपि निर्मले नीरे वन्हेरौष्ण्यस्य संक्रमः ।
न प्रकाशस्य तद्वत्स्याच्चिन्मात्रोद्भूतिरेव च ।।१०

अन्वयार्थ - [यद्वा निर्मले नीरे अपि वह्नेः औष्ण्यस्य संक्रमः स्यात् न प्रकाशस्य-] किंवा निर्मल जलामध्येंहि अग्नीची उष्णताच येते,प्रकाश येत नाहीं. [तद्वत् च चिन्मात्रोद्भूतिः एव-] त्याप्रमाणें पूर्वोक्त वृत्तीमध्यें केवल चैतन्याचाच उद्भव होतो.

प्रकाशः- आतां हा चंद्राचा दृष्टांत बरोबर नाहीं, असें जर कोणास वाटत असलें तर त्याच्याकरितां आम्ही आणखी एक दृष्टांत देतों. चुलीमध्यें अग्नि पेटवून तिच्यावर स्वच्छ थंड पाण्याचें भांडें भरून ठेवलें असतां, त्यांतील पाण्यास कांहीं वेळानें आधण येतें म्हणजे अग्नीची उष्णता त्यांत येते, पण प्रकाश येत नाहीं. हें आबालवृद्धांस ठाऊक आहे. त्याप्रमाणें अंतःकरण जरी सत्त्वगुणाचेंच कार्य आहे; तरी रज व तम यांनीं प्रतिबद्ध झालेल्या त्याच्या वृत्तीमध्यें केवल आत्म्याचें चैतन्यच येतें; आनंद येत नाहीं; सारांश, पूर्वोक्त दृष्टान्तामध्यें जसें पाणी व अग्नि यांच्यामध्यें भांडें आड आलेलें असतें त्याप्रमाणें आत्मा व वृत्ति यांच्यामध्यें रज व तम हे आलेले असतात ।।१०।।

- पण शांतवृत्तींमध्यें चिदानंदाची प्रतीति येते याविषयीं दुसरा दृष्टान्त -

काष्ठे त्वौष्ण्यप्रकाशौ द्वावुद्भवं गच्छतो यथा ।
शांतासु सुखचैतन्ये तथैवोद्भूतिमाप्नुतः ।।११

अन्वयार्थ - [काष्ठे तु द्वौ औष्ण्यप्रकाशौ यथा उद्भवं गच्छतः-] पण काष्ठामध्यें उष्णता व प्रकाश हीं दोन्हीं जशीं उत्पन्न होतात, [तथा एव शांतासु सुखचैतन्ये उद्भूतिं आप्नुतः-] त्याप्रमाणेंच शांत वृत्तींमध्यें सुख व चैतन्य हीं दोन्हीं उत्पन्न होतात.

प्रकाश:- काष्ठांचा व अग्नीचा साक्षात् संयोग होत असल्यामुळें त्यांच्यामध्यें जसे अग्नीचे दोन्ही गुण येतात, त्याप्रमाणेंच केवल सत्त्वगुणानें युक्त व रजोगुण आणि तमोगुण यांच्या योगानें प्रतिबद्ध न झालेल्या वृत्तीमध्यें आत्म्याचें दोन्ही गुण येतात ॥११॥

-पण ही अशी व्यवस्था करण्याचें काय कारण ?' उत्तर -

वस्तुस्वभावमाश्रित्य व्यवस्था तूभयो: समा ।
अनुभूत्यनुसारेण कल्प्यते हि नियामकम् ॥१२

अन्वयार्थ - [वस्तुस्वभावं आश्रित्य तु उभयो: व्यवस्था समा-] वस्तूच्या स्वभावाचा आश्रय करून दोहोंचीहि व्यवस्था सारखीच आहे. [हि अनुभूत्यनुसारेण नियामकं कल्प्यते-] कारण अनुभवाप्रमाणें नियमन करणाऱ्या स्वभावाची कल्पना केली जाते.

प्रकाश:- प्रत्येक वस्तूचा स्वभाव कसा आहे, हें सूक्ष्मदृष्टीनें पाहून आम्ही दृष्टांत व दार्ष्टांतिक या दोघांचीहि सारखीच व्यवस्था लावितों. मात्र आम्ही स्वभाववादी नसल्यामुळें त्यांची व्यवस्था करितांना आमच्या अनुभवाप्रमाणेंच नियामकाचीहि कल्पना करितों. म्हणजे ज्याअर्थीं अमुक एक पदार्थांचा असा अनुभव येत आहे, त्याअर्थीं त्याच्यामध्यें हा अमुक एक धर्म असलाच पाहिजे. कारण त्यावांचून असा अनुभव येणें शक्य नाहीं. असा आम्हीं निश्चय करितों. जे स्वभाववादी असतात, ते अबाधित अनुभवाची अपेक्षा ठेवीत नाहींत. हाच त्यांच्या व आमच्यामध्यें फरक. ॥१२॥

-अनुभवच दाखवितात -

न घोरासु न मूढासु सुखानुभव ईक्ष्यते ।
शांतास्वपि क्वचित्कश्चित्सुखातिशय ईक्ष्यताम् ॥१३

अन्वयार्थ - [सुखानुभव: घोरासु न च मूढासु न ईक्ष्यते -] सुखाचा अनुभव घोर किंवा मूढवृत्तींमध्यें कधींच येत नाहीं. [शांतासु अपि क्वचित् कश्चित् सुखातिशय: ईक्ष्यताम्-] शांत वृत्तींमध्येंहि केव्हां केव्हांच कांहींसा सुखाचा अधिकपणा अनुभवास येतो.

प्रकाश:- राजस व तामस वृत्तींमध्यें तर सुखाचा अनुभव कधींच येत नाहीं. सात्त्विक वृत्तींमध्यें मात्र त्याच्या अधिकतेचा केव्हां केव्हां प्रत्यय येतो. ॥१३॥

-घोर व मूढ वृत्तींत सुखाचा अभाव दाखवितात -

गृहक्षेत्रादिविषये यदा कामो भवेत्तदा ।
राजसस्यास्य कामस्य घोरत्वात्तत्र नो सुखम् ॥१४

अन्वयार्थ - [यदा गृहक्षेत्रादिविषये काम: भवेत्-] ज्या वेळीं घर, शेत इत्यादि विषयांविषयीं इच्छा होते, [तदा राजसस्य अस्य कामस्य घोरत्वात् तत्र सुखं नो अस्ति-] तेव्हां या राजस तृष्णेस घोरत्व असल्यामुळें तेथें सुख नसतें.

प्रकाश:- कामना ही राजसवृत्ति आहे. राजसवृत्तीस घोर असेंहि म्हणतात. त्यामुळें तिच्यामध्यें सुखाचा लेशहि नसतो. ॥१४॥

-पण घोरवृत्तींमध्यें सुखाचा लेशहि नसतो, हें कशावरून' असें कोणी विचारील म्हणून सांगतात -

सिद्ध्येन्नवेत्यस्ति दु:खमसिद्धौ तद्विवर्धते ।
प्रतिबंधे भवेत् क्रोधो द्वेषो वा प्रतिकूलत: ॥१५

अन्वयार्थ - [सिद्ध्येत् न वा इति दु:खं अस्ति-] माझी इच्छा पूर्ण होईल कीं नाहीं असें दु:ख असतें; [असिद्धौ तत् विवर्धते-] पूर्ण न झाल्यास तें आणखीं वाढतें. [प्रतिबंधे क्रोध: भवेत्-] कोणी प्रतिबंध केल्यास क्रोध येतो, [वा प्रतिकूलत: द्वेष: भवेत्-] व प्रतिकूल झाल्यास द्वेष होतो. कारण प्रतिकूल नेहमीं दु:ख असतें.

प्रकाश:- कोणतीहि कामना म्हणजे दु:खाचा

प्रारंभच होय. कारण तो होतांच 'पण, ही सिद्ध होईल कीं नाहीं' अशी चिंता पुढें येऊन उभी राहते. चिंता हेंच दु:ख होय. कर्मधर्मसंयोगानें जर का ती पूर्ण न झाली, तर मग कांहीं विचारूं नका. तें पूर्वदु:खच अतोनात वाढतें. बरें आपल्या सिद्धीस कोणी विघ्न केले तर त्याच्याविषयीं असह्य क्रोध येतो. आणि जर का कोणी आपल्यास प्रतिकूल असा वागला, तर त्याच्याशीं हाडवैर पडतें. ॥१५॥

-त्याचा परिहार करणें अशक्य झाल्यास विषाद होतो. पण तोहि तामस असल्यामुळें त्यांत सुख नाहीं, असें सांगतात -

अशक्यश्चेत्प्रतीकारो विषाद: स्यात्स तामस: ।
क्रोधादिषु महद्दु:खं सुखशंकापि दूरत: ॥१६

अन्वयार्थ - [प्रतीकार: अशक्य: चेत् विषाद: स्यात्-] त्याचा प्रतीकार करितां येत नाहीं, असें जर वाटलें तर खेद होतो. [स: तामस:-] तो तमोगुणाचा विकार आहे. [क्रोधादिषु महत् दु:खं अस्ति-] सारांश क्रोधादिकांमध्यें मोठें दु:ख आहे. [सुखशंका अपि दूरत: एव-] त्यांत सुखाची नुस्ती शंकाहि दूरच राहते.

प्रकाश:- वैर पडल्यास सूड घेण्याची इच्छा होते पण शत्रु प्रबल आहे, आपल्यास त्याचा प्रतीकार करितां येण्यासारिखा नाहीं, अशी खात्री झाल्यास त्या बिचाऱ्या कामी पुरुषास अतोनात खेद होतो. खेद ही तामसी वृत्ति होय. तात्पर्य, क्रोधादिकांमध्यें सुखाचा लेशहि नसून ते दु:खांनीं भरलेले आहेत ॥१६॥

-त्याचप्रमाणें -

काम्यलाभे हर्षवृत्ति: शांता तत्र महत्सुखम् ।
भोगे महत्तरं लाभप्रसक्तावीषदेव हि ॥१७

अन्वयार्थ - [काम्यलाभे हर्षवृत्ति: शांता तत्र महत् सुखम्-] इष्ट वस्तूचा लाभ झाला असतां हर्षवृत्ति होते ती शांत आहे. तिच्यामध्यें मोठें सुख आहे. [भोगे महत्तरम्-] भोगामध्यें फारच मोठें सुख होतें. [हि लाभप्रसक्तौ ईषत् एव-] व लाभकाल आला असतां त्या मानानें थोडेंसेच सुख होतें.

प्रकाश:- लाभसमयीं शांत वृत्ति होते, व त्यामुळें प्राण्यास हर्ष होतो. पण इष्ट वस्तूचा लाभ होऊन तिचा भोग घेतांना तर त्याहूनहि अधिक आनंद होतो. फार काय ! इष्ट वस्तू आपणास मिळणार असें जरी नुस्तें वाटलें, तरी देखील कांहींसा आनंद होतोच. ॥१७॥

- पण -

महत्तमं विरक्तौ तु विद्यानन्दे तदीरितम् ।
एवं क्षांतौ तथौदार्ये क्रोधलोभनिवारणात् ॥१८

अन्वयार्थ - [विरक्तौ तु महत्तमं सुखं भवति-] विरक्तींत तर अतिशय सुख होतें. [तत् विद्यानन्दे ईरितम्-] तें विद्यानंदांत सांगितलें आहे. [एवं क्षांतौ तथा औदार्ये क्रोधलोभनिवारणात् भवति-] तसेंच क्षमा व औदार्य यांत क्रोध व लोभ यांचा लेशहि नसल्यामुळें त्यांमध्येंहि अतिशय आनंद होतो.

प्रकाश:- वैराग्यापासून होणारें सुख अवर्णनीय आहे. पण त्याचा गेल्या प्रकरणांत यथाशक्ति निर्देश केला आहे. क्षमा, उदारपणा व दुसऱ्याहि सर्व सात्त्विकवृत्तींमध्यें असाच अवर्णनीय आनंद आहे. ॥१८॥

-तात्पर्य -

यद्यत्सुखं भवेत्तत्तद्ब्रह्मैव प्रतिबिंबनात् ।
वृत्तिष्वंतर्मुखास्वस्य निर्विघ्नं प्रतिबिंबनम् ॥१९

अन्वयार्थ - [यत् यत् सुखं तत् तत् ब्रह्म एव भवेत्-] जें जें सुख तें तें ब्रह्मच होय. [प्रतिबिंबनात्-] कारण तें ब्रह्मच प्रतिबिंबित झालेलें असतें. [अंतर्मुखासु वृत्तिषु अस्य निर्विघ्न प्रतिबिंबनं भवति-] अन्तर्मुखवृत्तींमध्यें याचें निर्विघ्नपणें प्रतिबिंब पडतें.

प्रकाश:- विषयाच्या प्राप्तीपासून, भोगापासून, तें प्राप्त होणार असें वाटल्यामुळें किंवा अशाच आणखीं कोणत्याहि निमित्तानें होणारें जेवढें म्हणून सुख आहे तेवढें तें सर्व वृत्तीमध्यें ब्रह्म प्रतिबिंबित झाल्यामुळेंच होतें त्यांवांचून सुखाचा अनुभव होणें शक्य नाहीं; अंत:करण बाह्य व्यापार सोडून अंतर्मुख झालें असतां त्यामध्यें या ब्रह्माचें प्रतिबिंब निर्विघ्न पडतें. म्हणजे मनोवृत्ति जशा जशा अधिक अंतर्मुख होतात, तसा तसा सुखानुभवहि वाढतो. त्यास राजस व तामस वृत्ति प्रतिबंध करीत नाहींत. ॥१९॥

-आतां सर्वत्र ब्रह्मस्वरूपानुभव प्रदर्शित करण्यासाठीं त्याच्या स्वरूपाचें स्मरण करितात -

सत्ता चिति: सुखं चेति स्वभावा ब्रह्मणस्त्रय: ।
मृच्छिलादिषु सत्तैव व्यज्यते नेतरद्वयम् ॥२०

अन्वयार्थ - [सत्ता चिति: च सुखं इति ब्रह्मण: त्रय: स्वभावा:-] सत्ता, चैतन्य व सुख असे ब्रह्माचे तीन स्वभाव आहेत. [मृच्छिलादिषु सत्ता एव व्यज्यते-] पण मृत्तिका, दगड इत्यादिकांमध्यें त्यांतील सत्ताच व्यक्त होते, [इतरद्वयं न-] इतर दोन स्वभाव व्यक्त होत नाहींत.

प्रकाश:- ब्रह्माचे स्वरूपभूत असे तीन गुण आहेत पण ते सर्वच पदार्थांमध्यें व्यक्त होतात असें नाहीं. माती, दगड इत्यादि जड पदार्थांत केवल सत्ता (अस्तित्व)च व्यक्त होतें, चैतन्य व सुख व्यक्त होत नाहीं. ॥२०॥

- तसेंच -

सत्ता चितिर्द्वयं व्यक्तं धीवृत्योर्घोरमूढयो: ।
शांतवृत्तौ त्रयं व्यक्तं मिश्रं ब्रह्मेत्थमीरितम् ॥२१

अन्वयार्थ - [घोरमूढयो: धीवृत्तयो: सत्ता च चिति: इति द्वयं व्यक्तम्-] घोर व मूढ बुद्धिवृत्तींमध्यें सत्ता व चैतन्य हे दोन गुण व्यक्त होतात; [तथा शांतवृत्तौ त्रयं व्यक्तम्-] व शांत वृत्तींमध्यें सत्, चित्, आनंद हे तिन्ही गुण व्यक्त होतात. [इत्थं मिश्रं ब्रह्म ईरितम्] याप्रमाणें मिश्र-सप्रपंच ब्रह्म सांगितलें.

प्रकाश:- राजसी व तामसी बुद्धिवृत्तींमध्यें आत्म्याचें चैतन्य व सत्ता हें दोन गुण येतात. सात्त्विक वृत्तीमध्यें तर आत्म्याचे तिन्ही गुण येतात. तात्पर्य जडाशीं मिश्र होऊन राहणाऱ्या ब्रह्माचें हें वर्णन झालें. ॥२१॥

- पण आतां अमिश्र ब्रह्माचें ज्ञान कसें होतें तें सांगतात -

अमिश्रं ज्ञानयोगाभ्यां तौ च पूर्वमुदीरितौ ।
आद्येऽध्याये योगचिंता ज्ञानमध्याययोर्द्वयो: ॥२२

अन्वयार्थ - [अमिश्रं ब्रह्म ज्ञानयोगाभ्यां ज्ञायते-] अमिश्र, बह्म, ज्ञान व योग यांच्या योगानें जाणलें जातें. [तौ च पूर्वं उदीरितौ-] त्या दोघांचेंहि वर्णन पूर्वी झालें आहे. [आद्ये अध्याये योगचिंता च द्वयो: अध्याययो: ज्ञानम्-] म्हणजे पहिल्या अध्यायांत - अकराव्या प्रकरणांत योगाचा व त्याच्याच पुढच्या दोन अध्यायांत ज्ञानाचा विचार केला आहे.

प्रकाश:- जडाशीं मिश्र न झालेलें ब्रह्म ज्ञान, योग यांच्या द्वारा ज्ञात होतें. व त्यांचें सविस्तर वर्णन अकरा, बारा व तेरा या प्रकरणांत झालेलें आहे. ॥२२॥

-सत्, चित् व आनंद हीं तिन्ही जर ब्रह्माचीं रूपें आहेत तर मायेचें रूप कोणतें ?' उत्तर -

असत्ता जाड्यदु:खे द्वे मायारूपत्रयं त्विदम् ।
असत्ता नरशृंगादौ जाड्यंकाष्ठशिलादिषु ॥२३

अन्वयार्थ - [असत्ताच द्वे जाड्यदु:खे इति तु इदं मायारूपत्रयम्-] असत्त्व हें एक व जाड्य आणि दु:ख हीं दोन अशीं मायेचीं तीन रूपें आहेत. [नरशृङ्गादौ असत्ता तथा काष्ठशिलादिषु जाड्यम्-] मनुष्याचें शिंग इत्यादि पदार्थांमध्यें असत्त्व व काष्ठ, शिला इत्यादिकांमध्यें जडपणा असतो.

प्रकाश:- असत्त्व, जडपणा व दु:ख हीं तीन मायेची

रूपें आहेत. त्यांतील वांझेचा पुत्र, सशाचें शिंग, आकाशांतील पुष्प इत्यादि पदार्थांमध्यें असत्त्व असतें; व काष्टें, दगड इत्यादि जड पदार्थांमध्यें जाड्य असतें.॥२३॥

- त्याचप्रमाणें --

घोरमूढधियोर्दुःखमेवं माया विजृंभिता ।
शांतादिबुद्धिवृत्त्यैक्यान्मिश्रं ब्रह्मेति कीर्तितम् ॥२४

अन्वयार्थ - [घोरमूढधियोः दुःखम्-] घोर व मूढ वृत्तींमध्यें दुःख प्रतीत होतें. [एवं माया विजृंभिता-] याप्रमाणें माया विकास पावली आहे. 'शांतादि वृत्तींत ब्रह्माला मिश्र म्हणण्याचें कारण काय ?' उत्तर - [शांतादिबुद्धिवृत्त्यैक्यात् मिश्रं ब्रह्म इति कीर्तितम्-] शांतादिबुद्धिवृत्तींशीं ऐक्य पावल्यामुळें त्याला मिश्र ब्रह्म असें म्हटलें आहे.

प्रकाशः- घोर व मूढ वृत्तीमध्यें दुःखाचा प्रत्यय येतो. तात्पर्य, मायेचा विकास येणेंप्रमाणें झाला आहे. गेल्या एकविसाव्या श्लोकांत 'याप्रमाणें मिश्र ब्रह्म सांगितलें' असें म्हटलें आहे. पण एक मिश्र व दुसरें अमिश्र असा ब्रह्माचा भेद करण्याचें काय कारण ? असें कोणी कदाचित् म्हणेल म्हणून सांगतात :- शांत, घोर व मूढ या वृत्तींशीं तादात्म्य पावल्यामुळें त्यांत प्रतिबिंबित झालेल्या ब्रह्मास मिश्र असें म्हटलें आहे. ॥२४॥

- 'पण तें कथन कशासाठीं आहे ?' अशी शंका घेऊन 'ब्रह्माच्या ध्यानासाठीं' असें उत्तर -

एवं स्थितेऽत्र यो ब्रह्म ध्यातुमिच्छेत्पुमानसौ ।
नृशृंगादिमुपेक्षेत शिष्टं ध्यायेद्यथायथम् ॥२५

अन्वयार्थ - [एवं स्थिते अत्र यः पुमान् ब्रह्म ध्यातुं इच्छेत्-] असें सिद्ध झालें असतां या लोकीं जो पुरुष ब्रह्माचें ध्यान करण्याची इच्छा करीत असेल, [असौ नृशृंगादिं उपेक्षेत-] त्यानें मनुष्याच्या शिंगासारख्या मायागुणांनीं युक्त असलेला पदार्थांची उपेक्षा करावी, [च शिष्टं यथायथं ध्यायेत्-] व अवशिष्ट ब्रह्मतत्त्वाचें यथासंभव ध्यान करावें.

प्रकाशः- असत्व, दुःख व जाड्य यांनीं युक्त असलेल्या प्रत्येक पदार्थांची उपेक्षा करून सत्त्व, सुख व चैतन्यरूप ब्रह्माचें साधकानें ध्यान करावें म्हणून आम्हीं पूर्वोक्त वर्णन केलें आहे. ॥२५॥

-पूर्व श्लोकांत अवशिष्ट तत्त्वाचें यथासंभव ध्यान करावें असें सांगितलें, आतां तेंच ध्यान कोठें व कसें करावें तें सांगतात -

शिलादौ नामरूपे द्वे त्यक्त्वा सन्मात्रचिंतनम् ।
त्यक्त्वा दुःखं घोरमूढधियोः सच्चिद्विचिंतनम् ॥२६

अन्वयार्थ - [शिलादौ नामरूपे द्वे त्यक्त्वा सन्मात्रचिंतनं कार्यम्-] शिलादि पदार्थांतील नाम व रूप या दोहोंचाहि त्याग करून केवल सत्तेचें चिंतन करावें. [तथा घोरमूढधियोः दुःखं त्यक्त्वा सच्चिद्विचिंतनं कार्यम्-] त्याचप्रमाणें घोर व मूढ या वृत्तींतील दुःख टाकून सत्त्व व चैतन्य यांचें चिंतन करावें.

प्रकाशः- शिलादि पदार्थांत केवल सत् हाच ब्रह्माचा गुण असतो, यास्तव त्यांतील इतर सर्व गुण सोडून केवल सत्त्वाचें चिंतन करावें. नाम व रूप यांमध्यें इतर सर्व गुण येतात. त्याचप्रमाणें तामसी व राजसी वृत्तींमध्यें दुःख हा मायागुण व सत् आणि चित् हें ब्रह्मस्वरूप असतें. यास्तव मायागुणाचा त्याग करून दोन्ही ब्रह्मगुणांचें चिंतन करावें. ॥२६॥

- आतां सात्त्विकवृत्तींमध्यें ब्रह्माच्या तिन्ही गुणांचें ध्यान करावें असें सांगतात -

शांतासु सच्चिदानन्दांस्त्रीनप्येवं विचिंतयेत् ।
कनिष्ठमध्यमोत्कृष्टास्तिस्रश्चिंता: क्रमादिमाः ॥२७

अन्वयार्थ - [शांतासु सच्चिदानंदान् त्रीन् अपि

एवं विचिंतयेत्-] शांत वृत्तींमध्यें सत्, चित् व आनंद या तिन्ही गुणांचें ध्यान करावें. 'पण हें तिन्ही प्रकारचें ध्यान सारख्याच योग्यतेचें आहे का ?' उत्तर - [इमा: तिस्र: चिंता: क्रमात् कनिष्ठमध्यमोत्कृष्टा: सन्ति-] हें तीन प्रकारचें ध्यान क्रमानें कनिष्ठ, मध्यम व उत्तम आहे.

प्रकाश:- सारांश, या तीन प्रकारच्या चिंतनास कनिष्ठ, मध्यम व उत्तम असें म्हटलें आहे. म्हणजे शिलादिकांच्या ठिकाणीं असणाऱ्या सत्त्वाचें ध्यान करणें हें कनिष्ठ चिंतन, घोर व मूढ वृत्तींतील सत्त्व व चैतन्य यांचें ध्यान करणें हें माध्यम चिंतन आणि शांतवृत्तींतील सत्, चित् व आनंद यांचें ध्यान करणें हें उत्कृष्ट चिंतन होय. ॥२७॥

-निर्गुण ब्रह्माचें ध्यान करण्यास जे योग्य नसतात त्यांच्यावर उपकार करण्याकरितां त्यांनीं मिश्र ब्रह्माचें ध्यान करावें, असें सुचवितात -

मंदस्य व्यवहारेऽपि मिश्रब्रह्मणि चिंतनम् ।
उत्कृष्टं वक्तुमेवात्र विषयानन्द ईरित: ॥२८

अन्वयार्थ - [व्यवहारे अपि मंदस्य मिश्रब्रह्मणि चिंतनं उत्कृष्टं इति वक्तुम् एव अत्र विषयानंद: ईरित:-] व्यवहार करीत असतांनाहि मंद पुरुषाचें मिश्र ब्रह्मविषयक चिंतन उत्कृष्ट होय; असें सांगण्याकरितांच येथें विषयानंद सांगितलेला आहे.

प्रकाश:- व्यवहार केल्यावांचून ज्याचें चालतच नाहीं, व जे जात्याच मतिमंद आहेत, अशा पुरुषांस व्यवहार करीत असतांनाच ईश्वराचें ध्यान घडावें म्हणून युक्ति योजिली आहे. 'अशा मंद अधिकाऱ्यानें व्यवहारसमयीं मिश्र ब्रह्माचें चिंतन करणेंहि उत्तम होय,' असें सांगितल्यावांचून त्यांची प्रवृत्ति ब्रह्मचिंतनाकडे होणारच नाहीं. असें समजून ग्रंथकारांनीं या प्रकरणांत विषयानंदाचें विवेचन केलें आहे. ॥२८॥

- ह्याप्रमाणें वृत्तीसह होणारें त्रिविध ध्यान सांगून आतां वृत्तिरहित ध्यान सांगतात -

औदासीन्ये तु धीवृत्ते: शैथिल्यादुत्तमोत्तमम् ।
चिंतनं वासनानंदे ध्यानमुक्तं चतुर्विधम् ॥२९

अन्वयार्थ - [औदासीन्ये तु धीवृत्ते: शैथिल्यात् वासनानंदे चिंतनं उत्तमोत्तमम्-] उदासीन अवस्थेमध्यें तर बुद्धिवृत्ति शिथिल होत असल्यामुळें वासनानंदांतील जे ध्यान तें अत्त्युत्तम होय. पूर्वोक्त सर्व ध्यानाहून तें श्रेष्ठ होय. [एवं चतुर्विधं ध्यानं उक्तम्] याप्रमाणें चार प्रकारचें ध्यान सांगितलें.

प्रकाश:- ज्या वेळी साधक निरिच्छ झाल्यामुळें सर्व विषयांविषयीं उदासीन होतो, त्या वेळीं त्याच्या घोर, मूढ इत्यादि वृत्तीहि शिथिल होतात. म्हणजे त्यांच्यामध्यें पूर्वींप्रमाणें आपापलें कार्य करण्याची शक्ति नसते. त्यामुळें वासनानंदाचा अनुभव येतो. त्या आनंदामध्यें ब्रह्माच्या तिन्ही गुणांचें ध्यान करणें हें तर सर्वोत्कृष्ट ध्यान होय. असो; याप्रमाणें चार प्रकारचें ध्यान करणें सांगितलें. पण त्यांतील पहिली तीन ध्यानें अंत:करणवृत्तियुक्त असतात म्हणून त्यांस सवृत्ति व हें शेवटचें ध्यान वृत्तिशून्य असतें त्यामुळें यास निवृत्तिक असें म्हणतात. ॥२९॥

- हें ध्यान पूर्वोक्त ध्यानांहून भिन्न आहे, असें आतां सांगतात -

न ध्यानं ज्ञानयोगाभ्यां ब्रह्मविद्यैव सा खलु
ध्यानेनैकाग्र्यमापन्ने चित्ते विद्या स्थिरीभवेत्
॥३०

अन्वयार्थ -[ज्ञानयोगाभ्यां ध्यानं न -] हें ज्ञान व योग यांच्या योगानें होणारें ध्यान नव्हे.[सा ब्रह्मविद्या एव खलु-] ती ब्रह्मविद्याच आहे. [ध्यानेन ऐकाग्र्यं आपन्ने चित्ते विद्या स्थिरी भवेत्-] ध्यानाच्या योगानें एकाग्र झालेल्या चित्तामध्यें विद्या स्थिर होते.

प्रकाश:- या वासनानंदांतील ब्रह्मचिंतनालाहि जर

तुम्ही ध्यान म्हणूं लागाल तर तुम्ही पातंजलमताचा अंगीकार केलात, असें आम्ही समजूं कारण वृत्तिशून्य अवस्थेमध्यें परमेश्वराच्या गुणांचें ध्यान करणें म्हणजे सविकल्प समाधीच होय, अशी वाद्याची शंका आहे. तिचें निरसन करण्याकरितां सिद्धान्ती म्हणतात - वस्तुत: तें ध्यानहि नव्हे, कारण आत्मानंद व अद्वैतानंद या दोन प्रकरणांत सांगितलेल्या ज्ञानाच्या व योगानंदांतील योगाच्या योगानें हें ध्यान होत नसतें. त्यामुळें हें ब्रह्मज्ञानच होय. तर मग ही ब्रह्मविद्या कशी उत्पन्न होणार ? या प्रश्नानें आतां उत्तर देतात - पूर्वोक्त ध्यानाच्या योगानें चित्त एकाग्र झालें असतां हें ब्रह्मज्ञान स्थिर होते. ॥३०॥

- आतां या ध्यानास ब्रह्मविद्या म्हणण्याचें कारण सांगतात -

विद्यायां सच्चिदानंदा अखंडैकरसात्मताम् ।
प्राप्य भांति न भेदेन भेदकोपाधिवर्जनात् ॥३१

अन्वयार्थ - [विद्यायां सच्चिदानंदा: अखंडैकरसात्मतां प्राप्य भेदकोपाधिवर्जनात् भेदेन न भांति-] ज्ञानामध्यें सत्, चित् व आनंद हे अखंड व एकरसरूपतेस प्राप्त होऊन त्यांचा भेद करणारी उपाधि नसल्यामुळें भिन्न रूपानें भासत नाहींत.

प्रकाश:- प्रस्तुत ज्ञानसमयीं सत्, चित् व आनंद हे आत्म्याचें स्वरूपभूत गुण अखंड व एकरस आहेत. म्हणजे त्यांच्यामध्यें परस्पर भेद नाहीं व दुसरा कोणताहि गुण नाही, अशी प्रतीति येते. कोणत्याहि पदार्थामध्यें भेद जो भासत असतो, तो उपाधीमुळें भासत असतो. प्रस्तुत समयीं कोणत्याहि प्रकारची उपाधी नसल्यामुळें आनंदादि गुण भिन्नपणें भासत नाहींत. ॥३१॥

- आतां उपाधीमुळें आनंदादिकांत भेद कसा पडतो तें सांगतात -

शांता घोरा: शिलाद्याश्च भेदकोपाधयो मता: ।
योगाद्विवेकतो वैषामुपाधीनामपाकृति: ॥३२

अन्वयार्थ - [शांता: घोरा: च शिलाद्या: भेदकोपाधय: मता:-] शांत, घोर व शिलादिक ह्या आनंदादिकांचा भेद करणाऱ्या उपाधि मानलेल्या आहेत. [एषां उपाधीनां योगात् वा विवेकत: अपाकृति:-] या उपाधींचा परिहार योग किंवा विवेक यांच्या योगानें होतो.

प्रकाश:- शांत व घोर या वृत्ति आणि शिलादिक पदार्थ, या आनंदादिकांत भेद उत्पन्न करणाऱ्या उपाधि आहेत. यांचा, चित्ताचें ऐकाग्र्य व आत्मा आणि अनात्मा यांचा विवेक यांच्या योगानें बाध होतो. ॥३२॥

निरुपाधिब्रह्मतत्त्वे भासमाने स्वयंप्रभे ।
अद्वैते त्रिपुटी नास्ति भूमानन्दोऽत उच्यते ॥३३

अन्वयार्थ - [स्वयंप्रभे निरुपाधिब्रह्मतत्त्वे अद्वैते भासमाने सति त्रिपुटी न अस्ति अत: भूमानंद: उच्यते] स्वयंप्रकाश, निरुपाधिक व अद्वैत असें ब्रह्मतत्त्व भासूं लागलें असतां त्रिपुटी नाहींशी होते. यास्तव त्यास भूमानंद म्हटलें आहे.

प्रकाश:- अद्वैतसाक्षात्कार झाला असतां ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय ही त्रिपुटी नाहींशी होते. त्रिपुटी हें आत्म्याच्या अविद्येचें कार्य असल्यामुळें व आत्मज्ञानाच्या योगानें अविद्येचाच नाश झाल्यामुळें त्रिपुटीचा पत्ताहि राहात नाहीं. यास्तव तोच भूमा संज्ञक आनंद होय. ॥३३॥

- आतां प्रस्तुत प्रकरणाचा उपसंहार करितात -

ब्रह्मानन्दाभिधे ग्रंथे पंचमोध्याय ईरित: ।
विषयानन्द एतेन द्वारेणांत: प्रविश्यताम् ॥३४

अन्वयार्थ - [ब्रह्मानंदाभिधे ग्रंथे अयं विषयानंद: पंचम: अध्याय: ईरित:-] ब्रह्मानंदसंज्ञक ग्रंथांतील हा विषयानंद नामक पांचवा अध्याय सांगितला. [एतेन द्वारेण अंत: प्रविश्यताम्-] या

द्वारानें आंत प्रवेश करावा.

प्रकाश:- ब्रह्मानंद नामक पांच अध्यायाच्या या ग्रंथाचा हा-पांचवा म्हणजे शेवटचा अध्याय परिपूर्ण झाला. या विषयानंद असें म्हणतात. हा विषयानंद चित्त अंतर्मुख होण्यास फार उपयोगी पडतो. यास्तव हें चित्तैकाग्र्याचें द्वारच आहे, असें समजून बाह्य विषयांचा त्याग करावा व पूर्वोक्त युक्तीनें अंतर्मुख व्हावें. ॥३४॥

-आतां या पंचदशीसंज्ञक ग्रंथाची समाप्ति करितात -

प्रीयाद्धरिर्हरोऽनेन ब्रह्मानंदेन सर्वदा ।
पायाच्च प्राणिन: सर्वान् स्वाश्रिताञ्छुद्धमानसान् ॥३५

अन्वयार्थ - [हरि: च हर: अनेन ब्रह्मानंदेन सर्वदा प्रीयात्-] या ब्रह्मानंदाच्या योगानें सर्वदा हरि व हर प्रसन्न होवोत. [च स्वाश्रितान् शुद्धमानसान् सर्वान् प्राणिन: पायात्-] व आपले आश्रित आणि ज्यांचें मन शुद्ध आहे, अशा सर्व प्राण्यांचें पालन करोत.

प्रकाश:- विष्णु व शंकर यांच्यामध्यें ज्ञानी पुरुष भेद मुळींच धरीत नाहीं. हें सुचविण्याकरितां येथें ते दोघेहि प्रसन्न होवोत असें म्हटलें आहे. कांहीं वैष्णव शैवाची व शैव वैष्णवांची निंदा करीत असतात, पण तो शुद्ध मूर्खपणा आहे. ज्या पंथामध्यें किंवा धर्ममध्यें निंदेसारखे महादोष असतात, तो सन्मार्गच नव्हे. यावरूनहि सर्वत्र ईश्वराची भावना करण्याविषयीं उपदेश करणाऱ्या या आपल्या अद्वैत शास्त्राची योग्यता कळून येणार आहे. असो; ग्रंथकार सदय अंत:करणानें ईश्वराची शेवटीं पुन: प्रार्थना करीत आहेत; तो हरिहारात्मक नियंता आपल्या शुद्ध मनाच्या भक्ताचें सर्वदा रक्षण करो. खरोखर ग्रंथकारांची ही प्रार्थनाआम्हां मूढांस आशीर्वादरूप होवो, अशी 'प्रकाश'काराचीहि त्या नियंत्यास प्रार्थना आहे. परब्रह्म जरी एकरस आहे, तरी मोक्षावस्थेंत प्राण्यास वैषयिक सुखाप्रमाणेंच सुख होणें शक्य आहे असें जें कित्येकांस वाटत असतें, त्याचा या प्रकरणांत निरास केला आहे. कारण अद्वैतावस्थेंत त्रिपुटी नाहीं असें येथे स्पष्ट म्हटलें आहे. तात्पर्य, या सर्व ग्रंथाचें तात्पर्य निर्गुण, निरवयव, अद्वैत, भूमानंद, स्वप्रकाश व आत्मरूप अशा ब्रह्मवस्तूमध्यें आहे. ॥३५॥

इति पञ्चदश्यां ब्रह्मानन्दे विषयानन्द: ॥१५॥

॥ संपूर्णोऽयं ग्रन्थ: ॥

आचार्यभक्त कै. पं. द. वा. जोग
उपनिषत्तीर्थ यांची ग्रंथसंपदा

- सुबोध उपनिषत्संग्रह
- सार्थ पंचदशी
- वेदान्तसार
- तर्कसंग्रह
- वेदान्तपरिभाषा लघुकोश
- सांख्यकारिका - कौमुदीप्रकाश
- भारतीय दर्शनसंग्रह
- प्रस्थानत्रय भाष्यांचा उपसंहार
- गौडपादीयकारिका भाष्यार्थ प्रकाश
- श्री गीता भाष्यार्थ प्रकाश
- सुबोध भगवद्गीता
- सुबोध ब्रह्मसूत्र
- सुबोध अद्वैतसिद्धान्त दर्शन तत्त्वानुसंधानसार